प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा,
REGIONAL FORENSIC SCIENCE LABORATORY
गृह विभाग, महाराष्ट्र राज्य
HOME DEPARTMENT, MAHARASHTRA STATE
दूरध्वनी : २४६२८७९ फॅक्स : ०७१२-२४६२८७९
Tel : 2462879, Fax : 0712-2462879
E-Mail - dydir.rsflnagpur@maharashtra.gov.in

रहाटे कॉलनी चौक,
धंतोली,
नागपूर
Rahate Colony Square,
Dhantoli,
Nagpur-440012

जावक क्र. प्रान्यावैप्र/१४८०/२३
दिनांक : 12 JUN 2023

प्रति,
मा.प्राचार्य,
श्री.सचिदानंद शिक्षण संस्था,
तायवडे कॉलेज, माहादुला कोराडी,
नागपूर-४४००३०.

विषय :- न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिनस्त प्रयोगशाळांमध्ये राज्यातील विविध शासन मान्यताप्राप्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर नियुक्ती देण्याबाबत कार्यपध्दती विहित करणेबाबत.

संदर्भ :- १) मुंबई कार्यालयीन परिपत्रक क्र.न्या.वै.प्र.सं./प्रशा/परिपत्रक/मुं/का/४२७९-४२९३/२०२३, दि.०८.०६.२०२३.

२) आपले श्री.सचिदानंद शिक्षण संस्था, तायवडे कॉलेज, माहादुला कोराडी, जि.नागपूर. यांचे दि. ०९/०५/२०२३ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून सादर करण्यांत येते की, आपले संदर्भांकित पत्रास अनुसरुन संदर्भ क्रमांक १ अन्वये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिनस्त प्रयोगशाळांमध्ये राज्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर नियुक्ती देण्याबाबतची बाब विचारधीन होती. त्यानुषंगाने राज्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर नियुक्ती देण्याबाबत संदर्भ क्र १ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने या प्रयोगशाळेत बी.एस्सी व एम.एस्सी पदवी धारक विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर विनावेतन (विनामोबदला) नियुक्ती देण्यात येत आहे.

तसेच या सोबतच्या परिशिष्ठ-अ प्रमाणे कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून संबंधित विद्यार्थ्यांकडुन भरावयाच्या करारनामाचे प्रारूप या सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे आहेत.

तसेच न्यायसहायक विज्ञान संस्था (मुंबई, नागपूर व औरंगाबाद) मधील विद्यार्थ्यांव्यतिरीक्त शासन मान्यताप्राप्त कुठल्याही शैक्षणीक संस्थेतील विहित शैक्षणिक अर्हता धारण करून उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना विनावेतन (विनामोबदला) संचालनालयाच्या अधिनस्त प्रयोगशाळांमध्ये इंटर्नशीप करण्यासाठी या आदेशान्वये उपरोक्त नमूद विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार व त्यामधील अटी व शर्तीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

तरी आपल्या शैक्षणीक संस्थेतील विहित शैक्षणीक अर्हता धारण करणा-या संबंधित विद्यार्थ्यांचे नाव, संपुर्ण पत्ता, शैक्षणीक अर्हता व दुरध्वनी क्रमांक याबाबतची यादी आपल्या महाविद्याल्याच्या शिफारसपत्रासह या कार्यालयास पाठविण्यात यावा, हि विनंती.

आपला विश्वासू,

सोबत- परिशिष्ठ-अ व कराराचा नमुना

(डॉ. वि. ज. ठाकरे)
उपसंचालक
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशा
महाराष्ट्र शासन, गृह विभाग, नागपूर

Internship -H.O.

## परिशिष्ट - अ

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिनस्त प्रयोगशाळांमध्ये राज्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर नियुक्ती देण्याबाबतची कार्यपध्दती.

कार्यपध्दती (SOP) :-

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिनस्त प्रयोगशाळांमध्ये राज्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर नियुक्ती देण्याबाबतची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

अ) आवश्यक बाबी :-

१) शासन मान्यताप्राप्त कुठल्याही शैक्षणिक संस्थेतील उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसाठी महाविद्यालय/ विद्यापीठ प्रमुखांची शिफारस असणे आवश्यक राहील.

२) इंटर्नशिपसाठी शिफारस करण्यात येणा-या विद्यार्थ्यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र महाविद्यालयाकडून उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

३) इंटर्नशीप वर रुजू होताना विद्यार्थ्याने माझ्यावर कुठल्याही प्रकारचा पोलीस खटला व कोर्ट/कचेरी दावा प्रलंबित नाही तसेच कायदयाचे उल्लघंन केलेले नाही यांचे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील.

४) अ.क्र.१,२, व ३ प्रमाणे पुर्तता केल्यानंतर इंटर्नशिप विदयार्थ्यांना रुजू करुन घेण्यात येईल.

५) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये इंटर्नशिप करीता निवड झाल्यानंतर विद्यार्थ्याचे Police Verification त्याला इंटर्न म्हणून नियुक्त करुन घेण्यात येणा-या प्रयोगशाळेमार्फत करण्यात यावे.

६) इंटर्नशिप कालावधीत विद्यार्थ्यांना विनावेतन (विनामोबदला) इंटर्न म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

७) इंटर्नशिपसाठी संस्थेने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर नियुक्ती करण्याकामी महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट राज्य यांचा निर्णय अंतिम राहिल व सदर कालावधीत असे सर्व विद्यार्थी त्यांचे नियंत्रणाखाली राहतील.

८) यशस्वीरित्या इंटर्नशिप पूर्ण करण्यात येणा-या विद्यार्थ्यांना न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडून प्रमाणपत्र देण्यात येईल.

९) इंटर्नशिपसाठी शिफारस करण्यात येणा-या विद्यार्थ्यांचा इंटर्न कालावधी हा कमीत कमी ३ महिन्यांच्या कालावधीकरीता राहील.

१०) विद्यार्थ्यांनी इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये नेमून दिलेल्या प्रयोगशाळा व त्यामधील संबंधित विभागात कार्यालयीन वेळेत पुर्ण वेळ उपस्थित असणे बंधनकारक राहील. तसेच, इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये गैरवर्तन किंवा गोपनीयतेचा भंग झाल्यास सदर विद्यार्थ्याला अपात्र ठरविण्यात येवून प्रचलित शासन नियमानुसार त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

११) विभाग/कार्यालय प्रमुखांनी आदेश दिल्याप्रमाणे घटनास्थळाला (Crime Scene) वरीष्ठांसोबत भेट देणे विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील.

१२) इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याकडे महाविद्यालयाचे फोटो असलेले ओळखपत्र सोबत असणे बंधनकारक राहील.

१३) विद्यार्थ्यांना नियमित उपस्थिती असणे आवश्यक राहील तसेच विद्यार्थ्यांना कार्यालय प्रमुखांच्या पूर्वपरवानगी शिवाय रजा घेता येणार नाही.

१४) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये इंटर्नशिप करीता निवड झाल्यानंतर विद्यार्थ्याने १०० रु.स्टॅम्प पेपरवर विहित उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यात करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

१५) विद्यार्थ्याची इंटर्नशिपवर केलेली नियुक्ती हि केवळ तात्पुरती नियुक्ती असून कायमस्वरुपी नियुक्तीचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. तसेच इंटर्नशिप वर काम केले म्हणून नोकरीत सामावून घेणेबाबत विद्यार्थी कोणताही कायदेशीर/बाहय दबाव शासनावर/संचालनालयावर आणणार नाही.

१६) उपरोक्त सर्व अटी व शर्तीचे पालन करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक असून वाटप केलेल्या प्रयोगशाळेमध्ये इंटर्नशिपकरिता विद्यार्थ्यांनी तात्काळ हजर होणे गरजेचे आहे . उपरोक्त दर्शविलेल्या कालावधीत संबंधित विद्यार्थी हजर न झाल्यास तो इंटर्नशिपची संधी गमावेल व त्यांचा इंटर्नशिपकरिता विचार करण्यात येणार नाही

१७) कर्तव्याचे पालन करताना कार्यालयीन नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. नियमांचे उल्लंघन झाल्यास तसेच संपूर्ण इंटर्नशिप कालावधीत आपले काम समाधानकारक आढळून न आल्यास तसेच गैरवर्तन आढळून आल्यास कोणतेही कारण नमूद न करता किंवा पूर्वसूचना न देता इंटर्नशिपचा कालावधी संपण्यापूर्वीच समाप्त करण्यात येईल.

१८) इंटर्नशिप दरम्यान अत्याधुनिक उपकरणे व रसायने विभागातील अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने हाताळतील व अत्याधुनिक उपकरणे व रसायने यांचा योग्य वापर करतील.

१९) इंटर्नशिप विदयार्थी विभागातील अधिकारी यांच्या मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली चाचण्या व दैनंदिन कामकाजात मदत करतील.

२०) इंटर्नशिप कालावधी संपुष्टात आल्यानंतर विद्यार्थी ताब्यात असलेली सर्व कार्यालयीन नोंदी, कागदपत्रे, दस्तावेज, पुस्तके व इतर कार्यालयीन साहित्य कार्यालयास परत करण्यास बांधील राहिल.

ब) इंटर्नशिप कालावधी दरम्यान करावयाच्या कामाचे स्वरुप :-

इंटर्नशिप साठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये वैज्ञानिक सहायक (गट-क) व वैज्ञानिक सहायक (सायबर गुन्हे व तासी) (गट-क) या पदासाठी खालील नमूद केलेली कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडणे आवश्यक राहील.

१. अधिका-यांना त्यांच्या विश्लेषणाच्या कामात सर्वतोपरी सहाय्य करणे /अधिका-यांना संगणकीय विश्लेषणात मदत करणे.

२. रासायनिक विश्लेषणासाठी लागणारी प्रक्रिया द्रावणे अधिका-यांच्या मार्गदर्शनखाली तयार करणे.

३. प्रकरणासंबंधिच्या विश्लेषणाची पूर्वतयारी करणे.

४. विश्लेषणासंबंधिच्या प्रक्रियानंतरच्या निरिक्षणाच्या नोंदी नोंदवहयांमध्ये व विहित नमूना फॉर्मवर अधिका-यांच्या मार्गदर्शनानुसार करुन घेणे.

५. प्रकरणांसंबंधीचा पत्रव्यवहार व इतर पूरक माहितीसाठी अधिका-यांना सहाय्य करणे.

६. विभागाच्या स्विकृती विभागामध्ये प्रकरणे दाखल करुन घेण्याच्या प्रक्रिया विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखाली व्यवस्थित पार पाडणे.

७. अधिका-यांना विभागातील रसायने, प्रयोगशाळा साहित्य, उपकरणे, ग्रंथालय, पुस्तके यांच्या पडताळणीसाठी घ्यावयाच्या नोंदीसाठी सहाय्य करणे.

८. विश्लेषित मुद्देमालाच्या परत करावयाच्या प्रक्रियेसाठी सहाय्य करणे.

उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तीचे व कार्यालयीन शिस्तीचे पालन करणे सर्व इंटर्न विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

FORENSIC SCIENCE LABORATORY
STATE OF MAHARASHTRA, MUMBAI
सत्यमेव जयते

डॉ. (सौ). सं. वि. घुमटकर
प्रभारी संचालक,
न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,
म.शा., आणि शासकीय रासायनिक विश्लेषक.

८

# कराराचा नमुना

मी.श्री./श्रीमती ----------------------------------------------आज दि.-------------असे प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, खाली नमुद १ ते १० अटी व शर्ती मला मान्य आहेत.

१. इंटर्नशिपसाठी संस्थेने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपवर नियुक्ती करण्याकामी महासंचालक (न्यायीक व तांत्रीक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा निर्णय अंतिम राहील व सदरकालावधीत असे सर्व विद्यार्थी त्यांचे नियंत्रणाखाली राहतील.

२. विद्यार्थ्यांनी इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये नेमून दिलेल्या प्रयोगशाळा व त्यामधील सबंधित विभागात कार्यालयीन वेळेत पूर्ण वेळ उपस्थित असणे बंधनकारक राहील. तसेच, इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये गैरवर्तन किंवा गोपनीयतेचा भंग झाल्यास सदर विद्यार्थ्याला अपात्र ठरविण्यात येवून प्रचलित शासन निर्णयानुसार/नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३. विभाग/कार्यालय प्रमुखांनी आदेश दिल्याप्रमाणे घटनास्थळाला (Crime Scene) वरिष्ठासोबत भेट देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

४. इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याकडे महाविद्यालयाचे फोटो असलेले ओळखपत्र सोबत असणे बंधनकारक राहील.

५. विद्यार्थ्याच्या नियमित उपस्थिती असणे आवश्यक राहील.

६. विद्यार्थ्यांना कार्यालय प्रमुखाच्या पूर्वपरवानगी शिवाय रजा घेता येणार नाही.

७. प्रयोगशाळेत प्रतीवेदीत होणा-या मेडीको-लीगल प्रकरणांमध्ये गोपनीयता ठेवणे आवश्यक असून गोपनियतेचा भंग होणार नाही याची काळजी विद्यार्थ्याने घेणे बंधनकारक राहील.

८. गोपनियतेचा भंग झाल्यास सदर विद्यार्थ्याला त्वरित काढून टाकण्याची कार्यवाही संचालक स्तरावर करण्यात येईल. तसेच, त्याचेवर नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

९. इंटर्नशिप हि नियुक्ती नसून त्यांना कायमस्वरुपी नियुक्तीचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.

१०. इंटर्नशिप कालावधी दरम्यान करावयाच्या कामाचे स्वरुप:-

इंटर्नशिप निवड झालेल्या विद्यार्थ्यांना न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये वैज्ञानिक सहायक (गट-क) व वैज्ञानिक सहायक (सायबर गुन्हे व तासी) (गट-क) या पदासाठी खालील नमूद केलेली कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडणे आवश्यक राहील.

<u>वैज्ञानिक सहायक/ वैज्ञानिक सहायक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) (गट-क)</u>

१. अधिका-यांना त्यांच्या विश्लेषणाच्या कामात सर्वतोपरी सहाय्य करणे./अधिका-यांना संगणकीय विश्लेषणात मदत करणे.
२. रासायनिक विश्लेषणासाठी लागणारी प्रक्रिया द्रावणे अधिका-यांच्या मार्गदर्शनखाली तयार करणे.
३. प्रकरणासंबंधिच्या विश्लेषणाची पूर्वतयारी करणे.
४. विश्लेषणासंबंधिच्या प्रक्रियानंतरच्या निरिक्षणाच्या नोंदी नोंदवहयांमध्ये व विहित नमूना फॉर्मवर अधिका-यांच्या मार्गदर्शनानुसार करुन घेणे.
५. प्रकरणांसंबंधीचा पत्रव्यवहार व इतर पूरक माहितीसाठी अधिका-यांना सहाय्य करणे.
६. विभागाच्या स्विकृती विभागामध्ये प्रकरणे दाखल करुन घेण्याच्या प्रक्रिया विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखाली व्यवस्थित पार पाडणे.
७. अधिका-यांना विभागातील रसायने, काचसामान, प्रयोगशाळा साहित्य, उपकरणे, ग्रंथालय, पुस्तके यांच्या पडताळणीसाठी घ्यावयाच्या नोंदीसाठी सहाय्य करणे.
८. विश्लेषित मुद्देमालाच्या परत करावयाच्या प्रक्रियेसाठी सहाय्य करणे.

उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तीचे व कार्यालयीन शिस्तीचे पालन करणे बंधनकारक राहील. वरील अटी व शर्ती मला मान्य असून मी त्यांचे काटेकोरपणे पालन करेन.

विद्यार्थ्याचे नाव व सही

...SIC SCIENCE LABORATO...

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐

NAGPUR TREASURY
BU 889365
24 MAR 2023
Stamp Head Treasury Clerk

## AGREEMENT

**THIS AGREEMENT is made on 28th March 2023**

**Between**

**Maharashtra Information Technology Support Centre, Kolhapur, Maharashtra**

**AND**

**TAYWADE COLLEGE, MAHADULA-KORADI (TH-KAMPTEE), DIST NAGPUR**

**पार्श्वभूमी:**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या निवडक महाविद्यालयांमध्ये "CENTER OF EXCELLENCE" उभे केले जाणार आहेत. या पाठीमागील महत्वाची भूमिका अशी की, राज्यांमध्ये स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणात मुले शहरी भागांमध्ये स्थलांतरित होत असतात. जीवनातील उमेदीच्या काळातील अनेक वर्ष केवळ स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी घरापासून, गावापासून, पालकांपासून लांब राहणाऱ्या मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्याचे वातावरण तयार होते. याचे प्रमाण राज्यांमध्ये लाखोंच्या घरात आहे. खाजगी प्रशिक्षण संस्थांचे उद्देश वेगवेगळे असल्यामुळे सरसकट सर्व मुलांना प्रोत्साहन देऊन यामध्ये गुंतवून ठेवण्याचा एक प्रयत्न होत असतो आणि मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थी या दुष्टचक्रात अडकतात. स्पर्धा परीक्षेचे नियोजन करत असताना स्वतःच्या करिअरसाठी एक "प्लॅन बी" देखील तितका सक्षमपणे तयार ठेवला पाहिजे आणि एका योग्य वयानंतर करिअरचा मार्ग बदलून योग्य निर्णय घेतला पाहिजे, याचे मार्गदर्शन देण्याची यंत्रणा उभे करणे हा सेंटर स्थापनेमागील महत्वाचा उद्देश आहे. याबाबत कट्ट्या अंतर्गत **महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व महाविद्यालय** यांच्यामध्ये असणारा सामंजस्य करार पुढील प्रमाणे:

१) मुद्रांक विक्री नोंद वही अनु. क्रमांक 39126 दिनांक 21/3/2023
करारनामा
प्रिन्सीपल तायवाडे कॉलेज कोराडी
टी. एन. ठोकळे
मुद्रांक विक्रेता
जिल्हाधिकारी परिसर, नागपूर (शहर)
ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

**पार्टी नंबर १**

**यशवंत शितोळे**

अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

पत्ता: करिअर कट्टा, महिला बँक तळमजला, खासबाग मैदानाजवळ,मंगळवार पेठ, कोल्हापूर-१२

**पार्टी नंबर २**

**Dr. Sharyou B.Taywade**
**Principal**
**Taywade College, Mahadula-Koradi (Nagpur)**

**संकल्पना:**

महाराष्ट्र राज्य शासनाकडून सध्या राज्यभरामध्ये सहा ठिकाणी "Pre IAS Training" सेंटरच्या माध्यमातून 740 विद्यार्थ्यांच्या निवासी प्रशिक्षणाची यंत्रणा अस्तित्वात आहे. करिअर कट्ट्याच्या माध्यमातून राज्यभरामध्ये 10,000 विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठीची व्यवस्था निर्माण करणे तसेच राज्यातील महाविद्यालयांमध्ये उद्योजकीय संस्कार घडावेत व उद्योग-व्यवसाय निर्माण करणारी युवा पिढी पुढे यावी, या उद्देशाने 5000 युवा उद्योजकांना महाविद्यालयीन स्तरावर उद्योजकीय विकासासाठी आवश्यक कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येईल. "CENTER OF EXCELLENCE" च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शहरातील स्थलांतर कमी करण्याचा तसेच नगण्य शुल्क आकारून विद्यार्थी आणि पालकांना स्थानिक पातळीवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, विद्यार्थी व पालकांसाठी तज्ञांकडून समुपदेशन केले जाईल. उद्योग क्षेत्रामध्ये तसेच व्यावसायिक क्षेत्रांमध्ये ज्यांनी आपलं कर्तृत्व सिद्ध केले आहे, अशा कर्तृत्व संपन्न व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली, नियंत्रणाखाली CENTER OF EXCELLENCE कार्यरत राहील.

**1) स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी व अभ्यासिका:**

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे MPSC परीक्षेसाठी तयारीचे प्रमाण व UPSC, केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या नोकऱ्यांसाठी असणारे प्रमाण बघता महाराष्ट्रीयन विद्यार्थी तुलनात्मकदृष्ट्या केंद्र शासनाच्या नोकरीमध्ये कमी प्रमाणात तयारी करत असल्याचे लक्षात येते. यासाठी SSC & SSB याची माहिती विद्यार्थ्यांना योग्य वेळी झाली पाहिजे, त्याच्या तयारीसाठी अभ्यासवर्ग व प्रशिक्षण उपलब्ध झाले पाहिजे तसेच हे सर्व करत असताना त्याच्या राहत्या ठिकाणापासून शक्य तितक्याजवळ या गोष्टी उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जास्त विद्यार्थी संख्या असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये १०० विद्यार्थ्यांची अभ्यासिका जी पूर्णवेळ विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असेल. सदर अभ्यासिकेमध्ये ऑनलाईन लेक्चरची सुविधा असेल ज्यामध्ये केंद्रीय पद्धतीने संपूर्ण राज्यात एकाच वेळेला सर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये तज्ञ

व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. आवश्यकता भासल्यास दिल्ली, मुंबई, पुणे या ठिकाणच्या तज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांची नियुक्तीदेखील करण्यात येईल.

CENTER OF EXCELLENCE या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सदर भरती प्रक्रियेसाठी निघालेल्या जाहिरातीची माहिती देणे, योग्य पद्धतीने कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, त्यांचे फॉर्म भरणे आणि परीक्षेची पूर्वतयारी करून घेणे तसेच ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी तज्ञ व्यक्तींकडून मुलाखतीची तयारी करून घेणे या पद्धतीचे उपक्रम राबवले जातील. वेगवेगळ्या परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी **सुविधा केंद्र** उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन समुपदेशनासाठी सोय असेल. विद्यार्थी व पालकांची मागणी असल्यास समुपदेशनासाठी स्वतंत्र सेशनचे नियोजन करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक क्षमतेचा विचार करता त्यांना स्पर्धा परीक्षा ऐवजी अन्य क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणे शक्य असल्यास याबाबत देखील मार्गदर्शन केले जाईल.

- **गुणवत्ता व नियंत्रण:**

1) 1000 पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयांमध्ये तसेच ज्या परिसरामध्ये एक 1500 पेक्षा जास्त विद्यार्थी पदवीच्या पहिल्या वर्षाला असतील त्या परिसरामध्ये CENTER OF EXCELLENCE उभारण्यात येत आहे.

2) या सेंटरमध्ये 100 विद्यार्थी एकाच वेळी अभ्यास करू शकतील, अशी अभ्यासिकेची रचना करण्यात येईल. त्यासाठी लागणारे बेंचेस, लेक्चरसाठीचे interactive board असतील.

3) सोबत Common Facility Center असेल ज्यामध्ये संगणक उपलब्ध करून विद्यार्थी आपले कागदपत्र स्कॅन करणे, परीक्षेचे फॉर्म भरणे, हॉल तिकीट generate करणे, प्रिंट काढणे या सोयी असतील.

4) या सेंटरमध्ये SSC/SSB/UPSC/MPSC या सर्व स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण चालतील व इतर वेळेला विद्यार्थी अभ्यासिकेत बसून स्वयं अध्ययन करतील.

5) अभ्यासिका सकाळी 06.00 ते संध्याकाळी 08.00 वाजेपर्यंत चालू असेल. यामध्ये संध्याकाळी 05.00 ते 08.00 online प्रशिक्षण असेल.

6) अभ्यासिकेचा मासिक खर्च निघावा यासाठी अग्रणी महाविद्यालय काही शुल्क करू शकतील, पण या माध्यमातून शुल्क ठरवत असताना क्लस्टरमध्ये येणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य व समन्वयक यांच्याशी सल्लामसलत करून ठरवावे.

7) या सेंटरमध्ये विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर जसा फोकस असेल त्याचप्रमाणे त्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेकडेही लक्ष देण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्यांची Psychology Test घेण्यात येईल. यातून तो विद्यार्थी कोणत्या स्पर्धा परीक्षेसाठी तयार आहे हे कळेल. ऑनलाइन समुपदेशनाच्या माध्यमातून पालकांना आणि विद्यार्थ्यांना समुपदेशन करतील. परंतु कोणाला वैयक्तिक समुपदेशन हवे असल्यास पालकांच्या मागणीप्रमाणे वैयक्तिक समुपदेशनही करण्यात येईल.

**२) उद्योजकता विकास केंद्र:**

राज्यात सद्यस्थितीला उद्योजकीय कौशल्य वाढीसाठी आवश्यक अशी व्यवस्था अस्तित्वात नाही. Entrepreneurship Development Cell, Incubation Center हे प्रत्येक महाविद्यालयामध्ये असावे असा राज्य व केंद्र शासनाच्या धोरणांमध्ये झालेल्या बदल विचारात घेता महाविद्यालयीन व्यवस्थापन, प्राध्यापक, प्राचार्य यांच्यापर्यंत हा विचार प्रभावीपणे पोहोचवणे आणि उद्योग क्षेत्रातील यशस्वी उद्योजकांच्या, संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या व बँक प्रशासनाच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, त्यांचा उद्योजकीय विकासाला चालना देणे या उद्देशाने महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक सेंटरमध्ये 50 विद्यार्थ्यांच्या Student Start-up च्या कामकाजासाठी कार्यालयीन व्यवस्था उपलब्ध करून देणे हा CENTREOF EXCELLENCE चा महत्वाचा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय संकल्पनांना विस्तारणासाठी आवश्यक असणाऱ्या व्यावसायिक सल्लागार व्यक्तींची उपलब्धता विद्यार्थ्यांना करून देणे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या उद्योजकीय बदलांविषयी, तंत्रज्ञानाविषयी आणि कायद्याविषयी त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करून देणे, विद्यार्थी आणि उद्योजक यांचा सातत्याने संवाद आयोजित करून त्या माध्यमातून उद्योग जगतातील घडामोडी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असतानाच त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी CENTER OF EXCELLENCE कार्यरत असेल. विद्यार्थ्यांच्या राजकीय नेतृत्वाच्या विकासासाठी विद्यार्थी संसद ज्या पद्धतीने कार्य करते त्याच पद्धतीने उद्योजकीय नेतृत्व विकासासाठी प्रत्येक सेंटरमध्ये "Student Start-up Company" नोंदणीकृत असेल आणि विद्यार्थी संसदेमधील मंत्रिमंडळाप्रमाणेच या कंपनीमधील व्यवस्थापकीय प्रमुख, आर्थिक व्यवस्थापक प्रमुख, या पद्धतीच्या वेगवेगळ्या पदांवर काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना यावा, यासाठी Student Start-up ला गती देण्यात येईल.

- **उद्देश:**

1) जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षा पास होऊ शकत नाहीत त्या विद्यार्थ्यांसाठी या सेंटरमध्ये उद्योजकता विकास हा उपक्रम राबविण्यात येईल.

2) यामध्ये 50 विद्यार्थ्यांना ऑफिस चालवण्यासाठी लागणारा set up उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामध्ये conference room, desk व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

3) 1 वर्ष हे विद्यार्थी student start up म्हणून काम करतील. या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी महाविद्यालयाबरोबर नोंदणी करून स्टार्टअप चालू करणार असतील त्यांना रुपये 1,00,000/- देण्यात येतील.

4) महाविद्यालयाला लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करणे, ग्रामीण भागातील वस्तू शहरी भागात उपलब्ध करून देणे व शहरी भागातील वस्तू ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे या प्रक्रियेमुळे एक Interconnected Hub निर्माण होऊ शकते व यातूनच विद्यार्थी उद्योग कसा करावा, हे समजू शिकतील.

5) यामध्ये जे विद्यार्थी प्रत्यक्ष कार्यानुभव घेतील त्यांना अनुभव प्रमाणपत्र देण्यात येईल.

6) यामध्ये विद्यार्थी Branding, Packaging, logo making, Service provider model, IPR formalities, Time management, decision making या सर्व गोष्टी शिकतील.

- **गुणवत्ता व नियंत्रण:**

1) या सगळ्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या भागातील प्रसिद्ध उद्योजक सल्लागार समितीवर कार्यरत असतील.

2) विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून एकदा मार्गदर्शन करण्यात येईल, ज्यामध्ये-

पहिला आठवडा:- बँकेच्या अधिकारी बँकांच्या योजना सांगतील.

दुसरा आठवडा:- जिल्ह्यातील उद्योग केंद्राचे अधिकारी मार्गदर्शन शासकीय योजना सांगतील.

तिसरा आठवडा:- प्रायव्हेट कन्सल्टंट यांचे मार्गदर्शन करतील.

चौथा आठवडा:- आंतरराष्ट्रीय उद्योजक ऑनलाईन मार्गदर्शन करतील.

- **नियम व अटी:**

1) क्लस्टरमध्ये सहभागी असणाऱ्या सर्व महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणारे सर्व विद्यार्थी करिअर कट्ट्याला नोंदणी करणे आवश्यक आहे, याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाच्या समन्वयकांची असेल.

2) CENTER OF EXCELLENCE चे निर्णय घेत असताना क्लस्टरमध्ये सहभागी महाविद्यालय समन्वयक व प्राचार्य, तसेच अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक प्राचार्य, त्या जिल्ह्याचे प्राचार्य प्रवर्तक तसेच जिल्हा समन्वयक, भागातील एक यशस्वी उद्योजक, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांचा समावेश असलेल्या स्थानिक नियामक मंडळाच्या बैठकीत संगणमताने घेण्यात यावेत.

CENTER OF EXCELLENCE नियामक मंडळ:

1) प्राचार्य प्रवर्तक
2) जिल्हा समन्वयक
3) क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे प्राचार्य
4) क्लस्टर मधील सहभागी महाविद्यालयाचे समन्वयक
5) अग्रणी महाविद्यालयाचे प्राचार्य
6) अग्रणी महाविद्यालयाचे समन्वयक
7) यशस्वी उद्योजक
8) निवृत्त प्रशासकीय अधिकारी
9) विद्यार्थी प्रतिनिधी

3) करिअर कट्ट्या अंतर्गत CENTER OF EXCELLENCE चालवत असताना 100 विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उभी करण्यासाठी जो Rs.10,00,000/- निधी दिला जाणार आहे. त्याची वितरण नियमावली पुढील प्रमाणे-

1) प्रतिवर्षी 20% (Rs. 2,00,000) या पद्धतीने निधी वितरण होईल.
2) पुस्तके, फर्निचर, डिजिटल साधनसामग्री (interactive board/sound system) याचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार महाविद्यालयाचा असेल.
3) निधी वितरित करत असताना क्लस्टर मध्ये असलेल्या करिअर कट्टा मधील सहभागी असणाऱ्या विद्यार्थी संख्येवर निधी वितरणाचे गुणोत्तर अवलंबून असेल.
4) करिअर कट्ट्याकडून केंद्रीय पद्धतीने वस्तू खरेदी करून महाविद्यालयास वितरित केल्या जातील, यासाठी करिअर कट्ट्याने स्थापन केलेली खरेदी समिती निर्णय घेईल.
5) CENTER OF EXCELLENCE साठी दिलेली जागा (अभ्यासिका/ Incubation Center) ही पूर्ण वेळ त्याच उद्देशासाठी वापरली जाणे आवश्यक आहे.
6) CENTER OF EXCELLENCE मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे खालीलप्रमाणे:
   50% जागा या अग्रणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी,
   20% जागा या pass out विद्यार्थ्यांसाठी,
   30% जागा या आजूबाजूच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असतील.
7) CENTER OF EXCELLENCE अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या Incubation Center साठी क्लस्टर मधून नियमक मंडळाने 15 विद्यार्थ्यांची निवड स्टुडन्ट स्टार्टअप कंपनीचे पदाधिकारी म्हणून करावी.
8) Incubation Center चे पदाधिकारी म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या नियोजित व्यवसायाची निवड करण्यासाठी नियामक मंडळ व निवडलेले पदाधिकारी यांनी वेगवेगळ्या संकल्पनांचे सादरीकरण घेऊन त्यामधून एका व्यवसायाची निवड करावी.
9) सदर निधी मधील 15 टक्के भाग हा व्यवस्थापकीय खर्चावर खर्च करता येईल उर्वरित 85% भाग हा व्यवसायाचे मुख्य उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वापरला जाणे आवश्यक आहे.
10) सदर व्यवसाय करत असताना महाविद्यालय करिअर कट्टा यांची आर्थिक जबाबदारी उपलब्ध करून दिलेल्या भांडवला इतकीच मर्यादित राहील. याव्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीची आर्थिक जबाबदारी/ दायित्व व्यवसायातून पदाधिकाऱ्यांनी निर्माण केल्यास त्याची जबाबदारी त्यांची वैयक्तिक राहील.

11) CENTER OF EXCELLENCE अंतर्गत येणाऱ्या Incubation Center ला नियमक मंडळांनी मान्यता दिलेल्या व्यवसायासाठी कोणत्याही पद्धतीचे कर्ज घेता येणार नाही.

12) महाविद्यालयाच्या आवारामध्ये व्यवसाय करत असताना त्या व्यवसायाचा कोणत्याही पद्धतीचा त्रास महाविद्यालयाच्या नियमित कामकाजास होणार नाही याची दक्षता व पदाधिकाऱ्यांनी घ्यावयाची आहे, तसेच सदर व्यवसाय करत असताना कोणत्याही समाजविघातक गोष्टींना प्रोत्साहन मिळेल अशा बाबींचा समावेश व्यवसायामध्ये असू नये.

13) मागील वर्षी दिलेला निधी वापरून केलेल्या व्यवसायातून काही नफा निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी मिळवला असल्यास त्याचे वितरण तीन समान भागांमध्ये करण्यात येईल यामध्ये विद्यार्थी पदाधिकारी, करिअर कट्टा व महाविद्यालय यांचा समावेश असेल.

14) सदर निधी वापरून केलेल्या व्यवसायामध्ये 100% तोटा झाल्यास कोणत्याही पद्धतीची वसुली विद्यार्थी पदाधिकारी किंवा महाविद्यालय यांच्याकडून केली जाणार नाही, तसेच पुढच्या वर्षी दिल्या जाणाऱ्या निधीवर त्याचा कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही.

15) महाविद्यालयाच्या प्रयत्नांमुळे सदर विद्यार्थ्यांनी केलेले व्यवसायामध्ये झालेल्या नफ्यातील करिअर कट्ट्याला मिळालेल्या नफ्याच्या हिश्यातील 50 % रक्कम पुढील वर्षी दिल्या जाणाऱ्या 1,00,000 रुपये निधीमध्ये वाढवून दिले जातील.

16) सदर व्यवसाय करत असताना विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक कायदेशीर बाबी, बाजारपेठेची माहिती, तसेच आर्थिक व्यवहार करत असताना घ्यावयाची काळजी याविषयी त्यांना सुरुवातीलाच प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

17) Revenue generate झाल्यावर त्यातील काही भाग लीड महाविद्यालयाचा असेल.

18) CSR/उद्योग मंत्रालय/Skill development याचा Additional fund महाविद्यालयाला उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असेल.

19) महाविद्यालयाच्या प्राधान्याप्रमाणे त्यांचे सभा घेऊन, त्यांची गरज पाहून त्यांना सेंटर चालू करण्यासाठी लागणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील.

वरील प्रमाणे सर्व प्रक्रिया पूर्ण करून परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा विषयी तसेच उद्योजकता विकास विषयी योग्य प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने सेंटर चालवत असताना महाविद्यालय व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे राहतील:

*** MITSC ची जबाबदारीः**

१) सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये सहभागी असणाऱ्या अग्रणी महाविद्यालयांना फर्निचर, पुस्तके, डिजीटल साधनसामग्री ( Interactive Board, sound systems) साठी उपलब्ध करून देणे, निधी उपलब्ध करून देणे.

२) सेंटर ऑफ एक्सलन्समधील कामकाज सुरळीत चालण्यासाठी आवश्यक त्या भेटी देणे.

३) सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये चालणाऱ्या कामकाजांवर नियमन आणि नियंत्रण ठेवणे.

४) सेंटर ऑफ एक्सलन्समधील विद्यार्थ्यांच्यासाठी ऑनलाईन पद्धतीने सर्व पद्धतीचे प्रशिक्षक उपलब्ध करून देणे.

५) सेंटर ऑफ एक्सलन्स आणि शासन/ विभाग यामध्ये समन्वयक म्हणून कार्य करणे.

६) महाविद्यालयाने नमेलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स समितीच्या सभा घेणे आणि आवश्यक तेथे निर्णयांस सहाय्य करणे.

७) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीचा वापर योग्य त्या कारणासाठी/ उद्देशपूर्तीसाठी होण्याकरिता यावर नियंत्रण ठेवणे.

८) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण हितासाठी आवश्यक असे विद्यार्थी हिताचे निर्णय घेणे.

*** महाविद्यालयाची जबाबदारी:**

१) सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सहभागी असणाऱ्या अग्रणी महाविद्यालयातील पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी करिअर कट्ट्याची नोंदणी करून घेण्याची जबाबदारी अग्रणी महाविद्यालयाची असेल.

२) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी आवश्यक अशा अभ्यासिका, Common Facility Center, Entrepreneurship Development Cell/ Incubation Center तयार करून घेणे आणि त्याचा पूर्णवेळ वापर त्याच कामासाठी करणे.

४) सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी करिअर कट्ट्यामार्फत दिलेल्या साहित्याची ( फर्निचर, पुस्तके, डिजीटल साधनसामग्री ( Interactive Board, sound systems) देखभाल आणि आवश्कतेनुसार दुरुस्ती करणे.

५) करिअर कट्ट्यामार्फत वेळोवेळी मागवले जाणारे विविध रिपोर्ट वेळेत सादर करणे.

६) करिअर कट्ट्याने ठरवून दिल्याप्रमाणे सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी समिती नेमणे, त्यांच्या नियमित सभा घेणे आणि त्याविषयी वेळोवेळी माहिती देणे.

७) अग्रणी महाविद्यालयाने परिसरातील इतर महाविद्यालये आणि करिअर कट्टा यामध्ये समन्वयक म्हणून काम करणे.

८) करिअर कट्ट्यातंर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करणेसाठी महाविद्यालयाच्या संस्थेची परवानगी आणि इतर बाबींची पूर्तता करून घेणे.

**कालावधी:**

सदर सामंजस्य करार नोंदणी तारखेपासून ६० **महिन्याच्या** कालावधीसाठी आहे.

**न्यायालयीन कार्यक्षेत्र :**

सदर सामंजस्य करारांतर्गत उद्भवलेल्या कोणत्याही कायदेशीर समस्येसाठी न्यायालयीन प्रक्रियेसाठी **कोल्हापूर जिल्हा** न्यायालय हे कार्यक्षेत्र असेल.

**दुरुस्ती व बदल :**

सदर सामंजस्य करारांतर्गत नियम अटी व कार्यपद्धतीमध्ये काळानुरूप विद्यार्थी हितासाठी काही बदल करावयाचे झाल्यास दोघांच्या संमतीने स्वतंत्र परिशिष्टाचा समावेश करून बदल करता येतील.

**पार्टी नंबर १**

**यशवंत शितोळे**
अध्यक्ष,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**पार्टी नंबर २**
**Dr. Sharyou B.Taywade**
**Principal**
**Taywade College, Mahadula-Koradi (Nagpur)**

**साक्षीदार :** 1) **नाव :** Chandrakant Bhaskar ______

2) **नाव :** Kishor V. Ghormade ______

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐

NAGPUR

BU 913593

13 APR 2023

Stamp Head Clerk / Cashier

# सामंजस्य करार

## करिअर कट्टा आणि तायवाडे कॉलेज, कोराडी

**पार्श्वभूमी:**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत युवकांच्या करिअरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने राज्यातल्या महाविद्यालयांमध्ये "करियर कट्टा" ची स्थापना केली जाणार आहे. या पुढाकाराची महत्वपूर्ण भूमिका अशी की, महाविद्यालयातील युवकांना त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आवश्यक त्या दिशा दाखवून त्यावर मार्गक्रमण करून यश संपादन करण्यासाठी सर्वोतोपरी उचित मार्गदर्शन मिळावे याकरिता समर्पित कार्य करणे आवश्यक आहे. महाविद्यालय आणि

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांना भवितव्याविषयी गांभीर्याने विचार करण्याकरिता प्रेरित करावे, कौशल्य विकसित आत्मनिर्भर पिढी घडविणे, स्पर्धा परीक्षा, उद्योजकता विकास, व्यवसाय निर्मिती, व्यक्तिमत्व विकास आदी संदर्भात तज्ञ मार्गदर्शकांचे विचार प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे याकरीता सक्षमपणे नियोजन करून योग्य मार्गदर्शन देण्याची यंत्रणा उभी करणे अत्यावश्यक आहे. याबाबत करिअर कट्ट्याअंतर्गत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व तायवाडे कॉलेज महादुला-कोराडी यांच्यामध्ये असणारा सामंजस्य करार पुढील प्रमाणे:

**पार्टी नंबर १:**

**श्री यशवंत शितोळे**

अध्यक्ष

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**पत्ता:** करिअर कट्टा, महिला बँक तळमजला, खासबाग मैदानाजवळ,मंगळवार पेठ, कोल्हापूर-१२

**पार्टी नंबर २:**

प्राचार्यांचे नाव : डॉ. शरयू ब. तायवाडे

महाविद्यालयाचे नाव : तायवाडे कॉलेज, कोराडी

**पत्ता:** तायवाडे कॉलेज, महादुला—कोराडी, तह. कामठी, जि. नागपूर — ४४१११११

**उद्देश:**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांचा संयुक्त उपक्रम "करिअर कट्टा" महाविद्यालयात स्थापन करणे व या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या दैदिप्यमान कारकिर्दीसाठी एकत्रित प्रयत्न करून प्रतिभावान युवक घडविणे.

या ध्येयाने प्रेरित विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे. हे सर्व उपक्रम महाविद्यालयांमध्ये राबवण्यासाठीचा सामंजस्य करार करण्यात येत आहे. याकरिता महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि महाविद्यालय परस्परपूरक भुमिका घेतील आणि त्याचे व्यापक परिणाम साधून विद्यार्थ्यांच्या स्वयंप्रकाशी कारकीर्द घडविण्यासाठी योगदान देतील.

**करिअर कट्ट्याची जबाबदारी:**

1. करिअर विषयक विविध दिशादर्शक मार्गदर्शन सत्रांचे नियोजन करणे.
2. स्पर्धा परीक्षांच्या तयारी साठी सर्वसमावेशक अभ्यासक्रम तयार करून त्यासाठी विशेष तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शन कोर्सेसची निर्मिती करून त्याचे डिजिटल कंटेंट उपलब्ध करून देणे.
3. महाविद्यालयीन युवा कौशल्याधिष्टीत विकसित व्हावे, यासाठी विशेष अभ्यासक्रम तयार करणे व मार्गदर्शक साहित्य उपलब्ध करून देणे.
4. उद्योजकता विकास करून व्यवसाय निर्मिती साठी आवश्यक माहिती पुरविणे व व्यवसाय उद्योग सुरु करण्यासाठी साहाय्य करणे.
5. २१ व्या शतकातील अत्यावश्यक कौशल्य धारण करणारा परिपूर्ण युवक घडविण्यासाठी व्यक्तिमत्व विकास संबंधित विशेष उपक्रमांचे आयोजन करणे.

**महाविद्यालयाची जबाबदारी:**

1. महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची करिअर कट्टा उपक्रमात नोंदणी करून घेणे.
2. करिअर कट्टा द्वारानिर्मित विविध कोर्सेससाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी प्रेरणा शिबीर कार्यक्रम राबविणे.
3. करिअर कट्टा ऑनलाईन कोर्सेसची अंमलबजावणी करण्यासाठी व्यवस्था आणि मनुष्यबळाचे नियोजन करून अभ्यासक्रम नियमितपणे राबविणे.
4. करिअर कट्टाच्या विशेष अभ्यासाक्रमानिमित्त पुरविल्या जाणारे अभ्यास साहीत्य प्रवेशित विद्यार्थ्यापर्यंत पोहाचविणे.
5. करिअर कट्टाच्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी महाविद्यालय परिसर, समाजमाध्यमे, आणि वर्गखोल्यांमध्ये जागृतीविषयक पुढाकार घेणे.
6. नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीबाबत वारंवार अहवाल घेऊन उपस्थितीमध्ये सातत्य राहील यासाठी प्रयत्न करणे.
7. विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे स्थानिक पातळीवरची साधनसामग्री उपलब्ध करून देणे.
8. करिअर कट्टाचे उपक्रम राबविण्यासाठी विद्यार्थ्यांचे स्वतंत्र मंडळ तयार करावे.

**नियम व अटी:**

1. विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी करिअर कट्टाच्या विशेष ॲपद्वारा (MITSC App from Google Play Store) प्रक्रिया पूर्ण करून तीन वर्षांच्या कालावधीसाठी एकवेळ शुल्क रु ३६५ भरणे आवश्यक आहे. सदर शुल्कामध्ये विद्यार्थ्याने ५०कोर्सेस, सर्व उपक्रमांसाठी तसेच स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन नि:शुल्क प्रवेश.
2. महाविद्यालय अथवा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र विद्यार्थ्यांकडून परिक्षा शुल्क वगळता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणार नाही.

3. सदर सामंजस्य कराराचा कालावधी ०५ वर्षासाठी असेल.
4. या कालावधीसाठी महाविद्यालायद्वारा करिअर कट्टाचे प्रभारी प्राध्यापक सामान्यतः बदलू नये. काही अपरिहार्य कारणास्तव आवश्यकता भासल्यास प्रभारी प्राध्यापक नियुक्त करतांना तशी अधिकृत माहिती महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र प्रशासनास प्रथम प्राधान्याने कळवावी.
5. करिअर कट्टाच्या प्रत्येक उपक्रमाची माहिती महाविद्यालयाच्या संपूर्ण कर्मचाऱ्यांना प्राप्त होईल या दृष्टीने समाजमाध्यमावरून प्रसारित करावी. महाविद्यालयाच्या पुढाकारातून कुठलाही उपक्रम राबवीत असतांना त्याविषयी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रास तसेच करीअर कट्टाचे जिल्हा तसेच तालुका समन्वयक, प्राचार्य प्रवर्तक यांना द्यावी.
6. या सामंजस्य करारा व्यतिरिक्त इतर महत्वपूर्ण उपक्रमांचे स्वतंत्र करार असल्यास त्या योजनेचा समावेश या करारात राहणार नाही.

**न्यायालयीन कार्यक्षेत्र:**

सदर सामंजस्य करारांतर्गत उद्भवलेल्या कोणत्याही कायदेशीर समस्येसाठी न्यायालयीन प्रक्रियेसाठी **कोल्हापूर जिल्हा** न्यायालय हे कार्यक्षेत्र असेल.

## दुरुस्ती व बदल :

सदर सामंजस्य करारांतर्गत नियम अटी व कार्यपद्धतीमध्ये काळानुरूप विद्यार्थी हितासाठी काही बदल करावयाचे झाल्यास दोघांच्या संमतीने स्वतंत्र परिशिष्टाचा समावेश करून बदल करता येतील. दोन्हीपैकी कोणत्याही एका पार्टीस करारमुक्त व्हायचे असल्यास तीस दिवस अगोदर लेखी सूचना घेऊन करारातून बाहेर पडता येईल.

**पार्टी नंबर १**

**श्री यशवंत शितोळे**

अध्यक्ष

महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**पार्टी नंबर २**

डॉ. शरयू ब. तायवाडे

प्राचार्य

Principal
Taywade College,
Mahadula, Koradi (Dist. Nagpur)

तायवाडे कॉलेज, कोराडी

**महाविद्यालय IQAC समन्वयक**

डॉ. गिरीष काटकर

तायवाडे कॉलेज, कोराडी

**महाविद्यालय करियर कट्टा समन्वयक**

डॉ. वर्षा वैद्य,

तायवाडे कॉलेज, कोराडी

## Memorandum of Understanding

## Between

**Taywade College of Arts, Commerce and Science**
**And**
**J D College of Engineering and Management, Nagpur**

**Context:**

The MEMORANDUM OF UNDERSTANDING (MOU) is between J D College of Engineering and Management, Nagpur (Hereafter called JDCOEM) and Taywade College of Arts, Science and Commerce, Nagpur (Hereafter called Taywade College) for the purpose of Cultural and Value Enhancement Knowledge System Exchange program under New Education Policy

These two colleges are situated in proximity and will be able to conduct Indian Cultural Knowledge and Information and Communication Technology (ICT) Exchange Programs to provide benefits to students and faculty of both institutions. The MOU will enable both institutes to jointly develop academic cooperation

**Reporting:**

It is mutually decided that the conduction of the programs, assessment and documentation related to the programs will be handled under the supervision of the HoD / Principal of both Colleges.

This MOU entered into between JDCOEM and Taywade College represented in MOU by the respective Directors/Principal on behalf of Board of Governors/Board of Management, of their Institutes which shall mean and include their successors in interest and assigns.

***Areas of Collaboration:***

The areas of collaboration between Taywade College, Nagpur and JDCOEM, Nagpur may include, but are not limited to:

1) Exchange of faculty, staff and students for teaching and training.

2) Exchange of information and resources in support of research and educational activities.

Following points are agreed upon as part of this understanding:

**Funding:**

It is understood by both the parties that there will be no financial transaction in the conduction of the programs and binding on the part of colleges. The financial aspect, if involved, will be dealt with by the individual departments / colleges at their own level.

**Terms and Conditions**

1. **Nature of Relationship:**

   1.1 This MOU is for collaboration between both parties, for mutual benefit, for the purpose of Indian Cultural Knowledge and Information and Communication Technology (ICT) Exchange Programs; enhancing the quality of the educational experience for the students.

   1.2 This MOU shall be valid for 3 years, from the date of signing and each party shall be at full liberty to terminate the collaboration, with a notice period of 3 months.

   1.3 Both parties shall take all reasonable steps to ensure the successful completion of the collaboration and co-operate with each other in duly carrying out the obligation agreed upon.

2. **Limitation and Warranties:**

   2.1 Each party shall ensure that the other is not put to any liability for any act of the respective party or associate.

   2.2 Each party represents that they have the full power and authority to enter into this MOU in general.

**AMENDMENT TO THE MOU**

No amendment or modification of this MOU shall be valid unless the same is made in writing by both the parties or their authorized representatives and specifically stating the same to an amendment of this agreement. The modification/ change shall be effective from the date on which they are made/ executed unless otherwise agreed to.

**ARBITRATION**

In the events of any dispute or difference between the parties hereto, such disputed or differences shall be resolved amicably by mutual discussion of the Director / Principal of the two institutes.

Now, therefore, for and in consideration of the foregoing premises the parties have signed the Memorandum of Understanding on 02/04/2024.

**PARTIES**

**Dr. S. V. Sonekar**
**Principal**
JDCOEM, Nagpur-441501

Principal
J D College of Engineering & Manageme
Khandala, Katol Road
Nagpur-441501

J D COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT NAGPUR

**For and on behalf of**

**Dr. Bhavna Ilamkar**
HOD, BSHD JDCOEM, Nagpur

Head of Department
Basic Science & Humanities Department
JD College of Engineering & Management
Nagpur

**WITNESS**

**Prof. Mirza Baig**
**HOD, IT/CSE-DS**

HOD
Information Technolog.
JDCOEM, Nagpu

**WITNESS**
**Mrs. Sarika Dive**
**Asst. Prof. JDCOEM, Nagpur**

**Dr. Sharayu B. Taywade**
**Principal**
Taywade College
Mahadula, Koradi, Nagpur-441111

Taywade College SEAL Mahadula, Koradi

Principal
Taywade College
Mahadula, Koradi (Dist. Nagpur)

**For and on behalf of**

**Dr. Varsha Vaidya**
**Prof. and Head of Dept.**

Head Department of English
TAYWADE CO... ADI.

WITNESS

**Dr. Vishnu Chauhan**
**Taywade College Koradi, Nagpur**

In written where of both parties put their hard seal on the day, month and year herein mentioned.